# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/२२१६ ३९६५ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
संकेतस्थळ : www.merc.gov.in / www.mercindia.org.in


जाहिरात क्र. ०१/२०१६-१७

# जाहीर नोटीस

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगात प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधींची निवड करण्यासाठी अर्ज

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) आयोगासमोरील कामकाजामध्ये विद्युत ग्राहकांची बाजू मांडण्यासाठी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०१२ मधील विनियम ७.२ व ७.१ नुसार अनुक्रमे (अ) संपूर्ण राज्यातील विद्युत ग्राहकांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी महाराष्ट्रातील इच्छुक व्यक्तींमधून व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधी म्हणून निवड करण्यासाठी, आणि (ब) मराठवाडा विभागातील इच्छुक संस्थांमधून मराठवाडा विभागातील विद्युत ग्राहकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी म्हणून निवड करण्यासाठी, अर्ज मागवित आहे.

व्यक्तिगत अर्जदारांनी त्यांची माहिती वरील विनियमांच्या परिशिष्ट – क नुसार, तर संस्थात्मक अर्जदारांनी त्यांची माहिती परिशिष्ट – ब नुसार पाठवावी. अर्जदारांनी, विनियम ४.१ आणि विनियम ४.२ मधील, लागू असेल त्याप्रमाणे, नमूद केलेल्या पात्रता निकषांची पूर्तता करीत असल्याची खात्री करावी.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०१२ ची प्रत आणि अर्जाचे नमुने आयोगाच्या **www.merc.gov.in, www. mercindia.org.in**) या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपामध्ये उपलब्ध आहेत. सदर अर्ज, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४००००५ यांना दिनांक ०६/०५/२०१६ रोजी पर्यंत मिळतील अशा रितीने पाठवावेत. या दिनांकानंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ११/०४/२०१६**

**सचिव**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**